International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 35 March – April - 2026

# उत्तर महाराष्ट्रातील कथालेखनातील लोक जीवनाचे चित्रण

**रिना भाऊराव पवार[1], प्रा. डॉ. अशोक लिंबेकर[2]**

[1]*संशोधक, जळगाव*

[2]*मार्गदर्शक, मराठी विभाग प्रमुख, संगमनेर नगरपालिका कला, डी.जे. मालपाणी वाणिज्य व बी. एन. सारडा विज्ञान महाविद्यालय, (स्वायत्त) संगमनेर,४२२६०५ , जि.अहिल्यानगर*

*Corresponding Author – रिना भाऊराव पवार*

**DOI - 10.5281/zenodo.20580092**

**प्रास्ताविक:**

मराठी साहित्यात कथा हा अत्यंत प्रभावी आणि लोकप्रिय साहित्यप्रकार मानला जातो. कथा या माध्यमातून समाजातील विविध स्तरातील जीवन, संस्कृती ,परंपरा आणि लोकजीवनाचे वास्तव चित्रण दिसून येते. उत्तर महाराष्ट्र हा प्रदेश सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध असून येथे खानदेशी बोली म्हणजे अहिराणी तर आहे त्याबरोबर लेवागन बोली, तावडी बोलीतून ही लोकपरंपरा, शेतीप्रधान, जीवनशैली आणि सामाजिक मूल्य आढळतात. या प्रदेशातील कथाकारांनी आपल्या कथांमधून ग्रामीण जीवन,लोकसंस्कृती, संघर्षमय जीवन आणि लोक माणसांचे जिवंत चित्रण केले आहे.त्यामुळे उत्तर महाराष्ट्रातील कथालेखनांमध्ये लोकजीवनाचे दर्शन स्पष्टपणे घडते.

विशेषतः प्रादेशिक साहित्यामध्ये स्थानिक जीवन पद्धती, परंपरा ,लोकमानस आणि सामाजिक रचना यांचे प्रतिबिंब स्पष्ट दिसून येते. उत्तर महाराष्ट्रामध्ये जळगाव, धुळे, नंदुरबार आणि नाशिक या जिल्ह्यांचा समावेश होतो. या प्रदेशाला खानदेश असे संबोधले जाते. येथे प्रामुख्याने शेती प्रधान अर्थव्यवस्था असून कापूस, केळी, ज्वारी, बाजरी यासारखे पिके घेतली जातात. आदिवासी समाजाचेही या प्रदेशात मोठे अस्तित्व आहे. भिल्ल ,पावरा, कोकणा यासारख्या जमातींचे जीवन त्यांच्या परंपरा, लोककला आणि सण- उत्सव या प्रदेशांच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहेत. या सर्व घटकांचा प्रभाव स्थानिक कथालेखनावर दिसून येतो.खानदेशी बोली ही येथील लोकजीवनाची ओळख असून कथाकारांनी या खानदेशी बोलीचा प्रभावी वापर करून कथांना वास्तववादी स्वरूप दिले आहे.

**ग्रामीण लोकजीवन:**

उत्तर महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने जळगाव, धुळे, नंदुरबार आणि नाशिक या जिल्ह्यांचा काही भाग येतो. या भागातील लोकजीवन, शेती, निसर्ग आणि पारंपारिक संस्कृतीशी जोडलेले आहे. येथील लोकांचे दैनंदिन जीवन,उत्सव, लोककला, लोकभाषा आणि रुढी, परंपरा यांचा प्रभाव कथालेखनावर दिसून येतो. खानदेशी बोलीभाषा ही या प्रदेशाची ओळख असून कथांमध्ये ती जिवंतपणे वापरली जाते. उत्तर महाराष्ट्रातील कथांमध्ये ग्रामीण जीवनाचे वास्तववादी चित्रण दिसते. गावातील दैनंदिन जीवन, शेतकऱ्यांचे कष्ट, दुष्काळ ,आर्थिक

अडचणी ,सामाजिक संबंध आणि संघर्ष यांचे चित्रण कथांमध्ये आढळते. अशोक कोळी यांच्या 'कुड' नावाच्या कथासंग्रहातील कथांमधून शेतमजुराच्या जीवनावर वैशिष्ट्यपूर्ण मांडणी केलेली आहे, या संग्रहाच्या प्रस्तावनेत, डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात."खेड्यातील कष्टकरी, श्रमजीवी माणसं, दारिद्र्य आणि दैनंदिन जगण्याच्या प्रश्नांनी गांजून जातात, कसं जगायचं हा पहिला मोठा प्रश्न त्यांच्यापुढे असतो, तो सारखा त्यांना छळत असतो, हैराण करीत असतो, परंतु यातून मुक्त होण्यासारखी परिस्थिती काही केल्या प्राप्त होत नाही. भाबडेपणा आणि आगांतिकता यामुळे बुडत्याचा पाय खोलात अशी अवस्था कधी कधी होते".१ जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुका परिसर तापी खोऱ्याच्या पलीकडे असून येथील शेती व्यवसाय हा कोरडवाहू जमिनीचा आहे. उद्योगधंद्यांचाही अभाव असल्याने शेतीवर गुजराण करणाऱ्याचे, शेत मजुरांची संख्या अधिक आहे. अशा शेतमजुरांच्या भावजीवनातील विविध प्रश्नांची मांडणी अशोक कोळी यांनी आपल्या कथेतून केलेली आहे. शेतकरी हा ग्रामीण समाजाचा केंद्रबिंदू असल्याने त्याचे जीवन त्याचे निसर्गाशी असलेले नाते आणि त्याच्या समस्या कथांमधून प्रकर्षाने मांडल्या जातात दुष्काळ ,पाण्याची टंचाई, शेतीवरील अवलंबित्व यामुळे निर्माण होणारे सामाजिक आणि आर्थिक प्रश्न कथांमध्ये वास्तववादी पद्धतीने व्यक्त होतात. असेच वास्तववादी चित्रण दीपध्वज कोसोदे यांच्या 'पंचनामा' या कथासंग्रहातील ग्रामीण भागात आजही जुन्या जाती संस्थेच्या अवशेष अस्तित्वात असल्याने त्यांच्या कथेतील दलित आणि सवर्ण या दोन्ही समाजातील व्यक्ती, प्रवृत्तीला प्रकट करणारा आहे. 'पंचनामा' या कथेत महापुरामुळे शेतीचे नुकसान झालेल्या दलित शेतकऱ्याविषयी गावातील कोतवाल आणि तलाठी यांची जातीय मानसिकता प्रकट होते. भरपाई मिळवून देण्याचे कबूल करून कचरू नावाच्या दलित शेतकऱ्याकडून पैसे घेतले जातात. पण त्याचे काम केले जात नाही. उलट त्याची हेटाळणीपूर्वक त्याला बोलले जाते."काय कचरूबॉ,इनामी तं् भेटेल हाये जमीन. तुमच्या लोकायले एवढं सरकार देते, तरी बी तुमी हावरटपणा करता. दुसऱ्या लोकायले तं् भेटू द्या एवढ्यादा."२ अशाप्रकारे अगंतिक दलितांची अवस्था लेखकाने या 'पंचनामा' कथेत प्रकट केली आहे. अ.फ.भालेराव यांचा 'कडगर' या कथासंग्रहात त्यांनी नोकरीमुळे कष्टकरी कुटुंबाला आर्थिक स्थैर्य प्राप्त होणे, वैवाहिक प्रथा परंपरेच्या वेळी भाऊबंदकीच्या मानपान, कष्टकऱ्यांचे दारिद्र्य, सामान्य माणसांची जगण्यासाठी ची धडपड केळी उत्पादक शेतकऱ्यांचे काबाळकष्ट ,जातीय विषमता, कौटुंबिक कलह ,खेडेगावातील श्रद्धा व समजूती यासारखे विषय घेऊन वैशिष्ट्यपूर्ण लोकजीवन प्रकट केलेले आहे.'बल्लीचं शेत'केळीचा बाग लावून चांगले काळजी शेतकरी घेतो. त्याच्या केळीच्या बागा विषयीच्या भावभावनांचे आशावादी चित्रण लेखकाने केलेले आहे."अरं! हा माणूस लेकरा बाळांचा धनी जिवंत मरणाशी सामना करतोय, तर दुसरा कुलरच्या हवे खाली बसून याच्या घामाची वाट लावतो".३ या कथेत लेखकाने कष्ट करूनही उपेक्षित राहणारा आणि कष्ट न करता सुख समाधानी जीवन जगणारा अशा शेतीशी निगडित असलेल्या लोकांचे जीवन तुलना करून लेखकाने प्रकट केले आहे.

**लोकसंस्कृतीचे दर्शन:**

आधुनिक काळात मोठ्या प्रमाणात शिक्षणाचा प्रसार झालेला असला तरी, सनातन रूढी, परंपरा, लोकसमजुती, अंधश्रद्धा आणि लोकधारणा यांचे अस्तित्व ही टिकून आहे. लोकदैवते त्याविषयीचे कुलाचार, सण-उत्सव, जत्रा, लोककला, पारंपारिक श्रद्धा यांचे वर्णन कथांमध्ये आढळते. बालाजी, खंडोबा, कानबाई, मारुती,

मुंजोबा, वेताळ, भैरोबा, भैरवनाथ, भुलाबाई अशी ग्रामदैवत या ठिकाणी अस्तित्वात आहे. होळी,पोळा, दिवाळी यासारखे सण तसेच जत्रा, उत्सव यामधून जीवनातील आनंद सामाजिक ऐक्य आणि संस्कृती परंपरा व्यक्त होतात. अशीच परंपरा संजीव गिरासे यांच्या कथासंग्रहातून दिसून येते ,डॉ. रमेश माने डफडं या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात, "केशबा हा जुन्या पिढीतला तर मुरल्या नव्या पिढीचा आंबेडकरी विचारांनी प्रभावी परंतु केशबा हा परंपरावादी आहे. पोळयाच्या तीन दिवस आधी केशबा आजारी पडतो व गावाला पोळयाचे तोरण कोण बांधेल बैलांच्या मिरवणुकी डफडं कोण वाजवीन असं तो सांगतो, परंतु पोळयापर्यंत तो बरा होत नाही ,तापाने फणफणलेला असतो तोरण बांधायला जाऊ शकत नाही, म्हणून मुरल्याला तोरण बांधायला सांगतो पण तो ऐकत नाही शेवटी बैल मिरवणुकीत डफडं वाजवण्यासाठी मुरल्याला बापा पुढे नर्माईने घेतो. तो मारुती मंदिराजवळ उभा राहून डफडं वाजवितो."४

अशाप्रकारे सामाजिक आणि सांस्कृतिक अनुभव घेत असताना उत्तर महाराष्ट्रातील कथाकारांनी त्यांच्या कथेतून लोकजीवन मांडलेले दिसते. याशिवाय लोकगीते लोकनृत्य आणि पारंपरिक प्रथा यामुळे कथांना स्थानिक रंग प्राप्त होतो.

**सामाजिक वास्तव:**

उत्तर महाराष्ट्रातील कथालेखनात सामाजिक वास्तवाचे प्रभावी चित्रण आढळते गरिबी शिक्षणाचा अभाव जातीय भेदभाव स्त्रियांची स्थिती स्थलांतर यासारख्या समस्या कथांमध्ये मांडल्या गेल्या आहेत ग्रामीण समाजातील बदलते मूल्य आधुनिकतेचा प्रभाव आणि पारंपारिक जीवन पद्धती यामध्ये संघर्ष कथांमधून दिसून येते विशेषतः आदिवासी समाजाचे जीवन त्यांच्या समस्या आणि त्यांच्या संस्कृतीचे चित्र हे या कथांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. असेच वैशिष्ट्य संजीव गिरासे यांनी आपल्या कथेतून खेड्यातील जातीय विषमता दारिद्र्य आणि समस्याग्रस्त शेतकरी जीवन आपल्या कथांमधून साकारलेला आहे व्रतस्थ या कथेतून पांडुरंगाची सेवा म्हणून लोकांसाठी कीर्तन करणाऱ्या आणि व्रतस्थ जीवन जगणाऱ्या निस्वार्थ तात्यांची चित्रण केलेले आहे."माणूस किती मोठा झाला तरी प्रपंच भागविण्यासाठी खोटं बोलावच लागतं मी ही खोटेच बोलतो! किर्तनाचा निमंत्रण मी स्वीकारतो, ते दोन पैसे मिळतील म्हणूनच ना! आणि वरून म्हणतो पांडुरंगाची भक्ती? व्रत? पांडुरंगा अरे, तुझी भक्ती मी पैशांमध्ये मोजतो असे नव्हे शेवटी हे पोटही देणारा तूच आणि भक्ती करून घेणार आहे तूच मला क्षमा कर".५ आणि कीर्तनात रममान होऊन शेवटी हृदयविकाराचा झटका येतो, त्यावेळी त्यांचा मित्र बापू यांना दवाखान्यात घेऊन जाण्याचे सांगतात त्यावेळी तात्या हळूच म्हणतात.

"बापू स्वतःला सांभाळा.....
अहो, ज्ञानेश्वर महाराजांनी सोळाव्या वर्षीच निरोप घेतला होता....
मी तर साठ वर्षानंतर जातोय...मला निरोप द्या..."६

अशाप्रकारे निस्वार्थपणे लोकोपयोगी व्रत पाडणाऱ्या व्यक्तींच्या जगण्याविषयीचा सामाजिक दृष्टिकोन यातून प्रकट होतो. तसेच गोकुळ बागुल यांच्या कथेत उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी कष्टकरी समाजाचे जीवन विश्व त्यांनी रेखाटलेले ते म्हणतात,"ग्रामीण खानदेशातील शेतकरी व कामकरी त्यांच्या कथा त्यांच्या व्यथा त्यांच्या दुष्काळ त्यांची शेती सर्व काही भयानक असं जीवन पाहता आले आणि त्यानंतर ग्रामीण माणसांबद्दल गंभीरपणे लिहू लागलो आपण ज्या भागात राहतो त्या भागातील माणूस कसा जगतो हे लिहिले पाहिजे याच भावनेने मी ग्रामीण कथा लिहू

लागलो.''७ यातून कथाकारांच्या अवतीभोवतीचा समाज कथेत रेखाटला गेला.

**भाषिक वैशिष्ट्ये:**

उत्तर महाराष्ट्रातील कथालेखनात एक महत्त्वाचा पैलू म्हणजे खानदेशी बोलीचा वापर बोलीभाषेमुळे कथाकारांनी लोकजीवन अधिक प्रभावीपणे मांडले आहे. त्यामुळे कथेमध्ये वास्तवात आणि स्थानिकता निर्माण होते पात्रांच्या संवादामधून लोक जीवनातील सहजता आणि भावनिकता स्पष्ट होते बोली भाषेच्या वापरामुळे कथांना प्रादेशिक वैशिष्ट्य प्राप्त होते आणि वाचकाला त्या प्रदेशातील वातावरणाचा अनुभव मिळतो.

दीपध्वज कोसोदे यांनी आपल्या कथासंग्रहात त्यांच्या भोवताली परिसरात बोलल्या जाणाऱ्या बोली भाषेचा वापर केलेला दिसतो त्या संदर्भात डॉ.मनोहर जाधव यांनी म्हटले आहे की,''दीप ध्वज कोसोदे यांनी खानदेशातील खानदेशी भाषेचा कलात्मक वापर अतिशय खुबीने केला आहे मुळात या कथा विश्वाची पार्श्वभूमी ही खानदेशी असल्यामुळे तेथील जनजीवनात वापरल्या जाणाऱ्या भाषेचा कौशल्यपूर्ण वापर कोसोदे यांनी केला आहे. खानदेशी बोली मधून हे अनुभव विश्व चित्रीत होणे ही लेखकाच्या अभिव्यक्तीची गरज आहे त्यामुळे अनुभवातील सच्चेपणा प्रामाणिकपणे व्यक्त होण्यास मदत होते. अनुभव आणि भाषा यांचा एक अनिवार्य घट्ट पीळ यातून दृष्टीस पडतो.''८ अर्थातच लेखकाने मुक्ताईनगर ,जामनेर ,बोदवड हे जळगाव जिल्ह्यातील तालुके आहेत तेथील सामाजिक अनुभव विश्व साकार करताना त्यांनी आपल्या परिसरातील लोकभाषा कथेचे माध्यम म्हणून वापरलेली आहे. अशोक कोळी यांनी कथांमधून आवश्यक त्या ठिकाणी अलंकारयुक्त भाषा वापरलेली आहे. तसेच ,

''कणसं लोट्याचं काम गडी करत होता. बाकीचे माणसं आपापल्या कामात.

मंधीस एक घटना घडली.

कणसं लोटणारा गडी मोठ्याने बोंबलून उठला…

'त्या'आवाजाने शंकर आन रघुशेठ दचकून उठले….

बोलणं थांमवून…. पयतस मशीनीकडे गेल्हे….

आत्याचा हात मशीनमध्ये अटकला व्हता…

तो जोराजोरानं बोंबलत व्हता…

वर्हून रक्ताच्या चिरकांड्या….

खालून लाल जवारीची धार लागली होती….''९

अर्थातच सुखी संसाराची स्वप्ने पाहणाऱ्या सामान्य मजुराच्या दुःखाचे आणि व्यथा वेदनांचे गडद प्रतिमा वाचकांच्या डोळयासमोर या ठिकाणी उभी राहते अशाप्रकारे अशोक कोळी यांनी पूर्णपणे तावडी बोलीभाषेचा वापर करून संपूर्ण कथा लिहिलेली आहे. अनंतराव पाटील यांनी धुळे परिसरातील ग्रामीण जीवनाचे यथार्थ दर्शन घडवत असताना लावण्या कथेत आलेले अहिराणी भाषेतील संवाद पाहण्यासारखे आहेत.

''कौन पोरगा, वो,हौ?''

अवं,हौ ते राघोजी भावना धाकला पोरगा, आन् मंग हौ काय् करंस?''

कालेजमा शिकस''१०

अशाप्रकारे नाट्यमय संवादाची रचना करून अहिराणी भाषिक माणूस व त्यांच्या बोलण्याचा ढंग यातून दिसून येतो. अहिराणी भाषेचा गोडवा मनाला जाणवतो. गोकुळ बागुल हे जळगाव जिल्ह्याच्या अंमळनेर तालुक्यातील अहिराणी भाषिक परिसरातीलच आहेत त्यांनी अहिराणी भाषा चांगली अवगत असल्याने कथालेखन करताना त्यांनी पात्रगत बोलीभाषेचा वापर केलेला आहे.

**कथाकारांचे योगदान:**

उत्तर महाराष्ट्रातील अनेक कथाकरांनी लोकजीवनाचे वास्तवादी चित्रण केले आहे. त्यांच्या कथांमधून ग्रामीण समाजाचे जीवन लोकसंस्कृती आणि मानवी भावना यांचे प्रभावी दर्शन घडते त्यांनी आपल्या अनुभवावर आधारित कथा लिहून या प्रदेशातील सामाजिक वास्तव साहित्यामध्ये मांडले आहे.

**निष्कर्ष:**

१) उत्तर महाराष्ट्रातील कथालेखन हे लोकजीवणाशी घट्ट जोडलेले आहे.

२) उत्तर महाराष्ट्रातील कथालेखनात अत्यंत जिवंत आणि वास्तववादी चित्रण दिसून येते.

३) उत्तर महाराष्ट्रातील कथांमधून ग्रामीण समाजाचे जीवन, लोकसंस्कृती, परंपरा आणि संघर्ष यांचे चित्रण दिसून येते.

४) उत्तर महाराष्ट्रातील प्रादेशिक कथालेखन केवळ साहित्यिक दृष्टां नाही तर सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीने ही महत्वपूर्ण ठरते.

५) लोकजीवनाचे जतन आणि त्यांचे साहित्यिक रूपांतर करण्याचे महत्त्वाचे कार्य या कथाकारांनी केलेले आहे.

६) खानदेशी बोली चा वापर स्थानिक संस्कृतीचे चित्रण आणि सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब यामुळे प्रदेशातील कथा लेखन आणि मराठी साहित्य त्यात महत्त्वाचे स्थान प्राप्त करते.

७) उत्तर महाराष्ट्रातील कथालेखनाचा अभ्यास केवळ साहित्यिक नव्हे तर सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

८) ग्रामीण जीवनाची आपल्या कथातून अभिव्यक्ती करताना लेखक बोलल्या जाणाऱ्या भाषेचा औचित्यपूर्ण वापर केलेला आहे आपल्या अनुभवाला कथारूप देण्यासाठी त्यांनी संपूर्ण कथाच बोलीभाषेतून लिहिलेली दिसते.

९) अहिराणी भाषिक लेखक आपल्या परिसरातील अहिराणी भाषा अवगत असल्याने कथालेखन करताना अहिराणी बोली भाषेचा वापर केलेला आहे.

१०) धुळे परिसरातील कथाकार ग्रामीण जीवनाचे यथार्थ दर्शन घडवीत असताना कथेतून त्या परिसरात बोलली जाणारी बोलीभाषा वापरतात आणि कथा अनुभवाला जिवंतपणे साकार करताना दिसतात.

**संदर्भसूची:**

१) डॉ मुलाटे वासुदेव : प्रस्तावना 'कुड'स्वरूप प्रकाशन औरंगाबाद प्र.आ.२००३पृ.११

२) कोसोदे दीपध्वज : 'पंचनामा'कथासंग्रह सुविद्या प्रकाशन, पुणे, प्र. आ. २०१० पृ.२४

३) भालेराव अशोक फकीरा : 'कडगर' विना प्रकाशन जळगाव प्र.आ.२००८ पृ.७४

४) डॉ रमेश माने : प्रस्तावना 'डफडं'राजश्री प्रकाशन पुणे प्र आ २००५ पृ.६

५) गिरासे संजीव :'डफडं'राजश्री प्रकाशन पुणे प्र आ २००५ पृ.६१

६) तंत्रेव पृ.६५

७) बागुल गोकुळ : 'उमेद'मनोगत कस्तुरी प्रकाशन अमळनेर २००७

८) डॉ जाधव मनोहर :'पंचनामा'सुविद्या प्रकाशन पुणे प्र आ २०१० पृ.५

९) कोळी अशोक : 'कुड'स्वरूप प्रकाशन औरंगाबाद प्र.आ.२००३,पृ.३८

१०)पाटील अनंतराव : 'आवडी'मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे १९९४,पृ.५९